विषय – अनुसूचित क्षेत्रा बाहेर कार्यरत पर्यवेक्षीका यांना अनुसूचित क्षेत्रात समायोजनाने पदस्थापना देणेबाबत.

संदर्भ -1.सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीबीसी/2023/प्र.क्र.54/आरक्षण/5 दि.05/10/2024.
2.ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.जिपब-414/प्र.क्र.112/आस्था-14 दि.15 मे, 2014.
3.ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक दि.15 मे, 2023.
4.अनुसूचित क्षेत्रात कार्यरत पर्यवेक्षिका यांना अनुसूचित क्षेत्राबाहेर पदस्थापना देणेबाबत समुपदेशन प्रक्रिया दि. 18 /03/2025

---

-आदेश-

जा.क्र. जि.प. अहिल्यानगर/मबावि/कार्या-1/ 232 /2025 अ. नगर दि.01 /04/2025

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र.1 च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदेने एकूण 1 उमेदवारांना 25 टक्के अनुसूचित (पेसा) क्षेत्रात मानधन तत्वावर पर्यवेक्षीका म्हणून नियुक्ती देण्यात येणार आहे. सदर उमेदवारांना अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाडी केंद्रात नियुक्ती देणे आवश्यक होते. तथापि संदर्भ क्र.3 चे शासन परिपत्रकात मुददा क्र.5 मध्ये अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) सरळसेवेची पदे भरणेबाबत नमुद तरतुदीनुसार अनुसूचित क्षेत्राचे रहिवासी असलेले व अनुसूचित क्षेत्राबाहेर कार्यरत असलेले अनुसूचित जमाती संवर्गातील पर्यवेक्षीका यांना अनुसूचित क्षेत्रातील रिक्त अंगणवाडी मध्ये संदर्भ क्र.2 च्या शासन निर्णयात दिलेल्या निर्देशाप्रमाणे पुढील प्रमाणे समायोजनाने पदस्थापना देऊन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होणेसाठी या आदेशाच्या दिनांकापासून कार्यमुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यरत पर्यवेक्षीकेचे नांव | सध्याचे कार्यालय | | समायोजीत करण्यात आलेले कार्यालय | |
|---|---|---|---|---|---|
| | | तालुका | बीट | एबाविसेयो प्रकल्प | बीट |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | श्रीम. हिराबाई खेताडे | संगमनेर | धांदळफळ | अकोले | कोतुळ |

बाल विकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प अकोले यांनी वरील कर्मचाऱ्यांना समायोजित करण्यात आलेल्या ठिकाणी हजर होणेसाठी त्यांचेकडील कार्यभाराबाबत पर्यायी व्यवस्था करुन तातडीने कार्यमुक्त करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा. सदर आदेश जिल्हा परिषदेच्या https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्यांचा सांकेतांक क्रमांक 202504010800007 आहे.

(आशिष येरेकर भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रति,

संबंधित कर्मचारी, द्वारा- बाल विकास प्रकल्प अधिकारी, एबाविसेयो- अकोले

२/-संबंधित कर्मचारी यांनी आदेशात नमूद केलेप्रमाणे समायोजित ठिकाणी हजर व्हावे. सदर आदेशाची अंमलबजावणी न केल्यास अथवा कुठलाही दबाव आणल्यास आपणाविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

**प्रत- माहितीस्तव व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना-**

- गटविकास अधिकारी, पंचायत समिती - अकोले /संगमनेर
- बाल विकास प्रकल्प अधिकारी, एबाविसेयो- अकोले / संगमनेर